५७ वा वार्षिक अहवाल

# सन २०१७–१८







# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

ऑडिट वर्ग 'अ'

बँकेच्या सातत्यपूर्ण यशामागे आहे आपणा सर्वांचा अढळ विश्वास

# श्री छत्रपती शिवाजी महाराज



निश्चयाचा महामेरु बहुत जनांसी आधारु ।।
अखंड स्थितीचा निर्धारु श्रीमंत योगी ।।



# प्रेरणास्थान

## पद्मविभूषण मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार

### अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस



कणखर नेतृत्व व कुशल मार्गदर्शक

**मा. आ. श्री. अजितदादा पवार**

माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



बारामतीचे भूषण

**संसदरत्न मा. खा. सौ. सुप्रिया सुळे**

# दि बारामती सहकारी बँक लि.

## संचालक मंडळ

(सन २०१५ ते २०२०)



श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष



श्री. अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष



श्री. रमणिक रामजी मोता



श्री. सचिन सदाशिव सातव



ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी



श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के



श्री. दिग्विजय पोपटराव तुपे



श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर



श्री. उध्दव सोपानराव गावडे



श्री. सुरेश गुलाबराव देवकाते



श्री. विजयराव प्रभाकरराव गालिंदे



श्री. कपिल राजेंद्र बोरावके



डॉ. वंदना उमेश पोतेकर



सौ. कल्पना प्रदिप शिंदे



श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)



ॲड. श्री. सतिश शिवलिंग सालपे
तज्ञ संचालक



श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक



श्री रविंद्र शिवाजीराव बनकर
सरव्यवस्थापक (प्रशासन)



श्री विनोद कांतीलाल रावळ
सरव्यवस्थापक (वित्त)

# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

## पनवेल शाखा उद्‌घाटन समारंभ

शुक्रवार दि. ०७ एप्रिल २०१७ रोजी सायं. ५.३० वा. मा. आ. श्री. सुनिल तटकरे, विधान परिषद सदस्य यांचे शुभहस्ते व मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





## मोहोळ शाखा उद्‌घाटन समारंभ

शनिवार दि. २२ एप्रिल २०१७ रोजी सायं. ५.०० वा. मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. खा. श्री. धनंजयराव महाडीक, अध्यक्ष भिमा सह. साखर कारखाना, टाकळी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





**दि बारामती सहकारी बँक लि.**

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांसाठी)

## विशेष सूचना

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार **दिनांक : ९ सप्टेंबर २०१८ रोजी** सकाळी १०.०० वाजता राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, भिगवण रोड, बारामती या ठिकाणी बोलविण्यांत आली आहे. सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज घेण्यांत येईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## ❊ सभेपुढील विषय ❊

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ०३ सप्टेंबर २०१७ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१८ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रके वाचून मंजूर करणे.
३. सन २०१७-२०१८ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांष जाहीर करणे.
४. मा. सरकारी लेखापरिक्षक यांनी तपासणी केलेल्या सन २०१७-२०१८ सालच्या आर्थिक हिशोब तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे, तसेच सन २०१६-१७ च्या सरकारी लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
५. सन २०१८-२०१९ या वर्षासाठी बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
६. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी सरकारी लेखापरिक्षक व स्थानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडे चालू आर्थिक वर्षात असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
८. सन २०१८-२०१९ या आगामी आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे व मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.
९. सदर वर्षात सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१०. बँकेच्या शाखांकरिता जागा खरेदी करण्यासाठी इमारत निधीचा विनियोग करण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
११. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित विषयांचा विचार करणे.

**दिनांक : २१ ऑगस्ट २०१८**

**स्थळ : बारामती**

**मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेनुसार**

**श्री. गो. बहुळकर**
**कार्यकारी संचालक**

## ❊ विशेष सूचना ❊

१. ही सभा कोरम अभावी तहकूब करावी लागल्यास सभा अर्धा तास तहकूब केली जाईल व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब झालेली सभा घेतली जाईल. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.
२. सभासदांना वर नमूद विषया संबंधी काही विचारावयाचे असल्यास तसे त्यांनी दि. ५/९/२०१८ अखेर पर्यंत बँकेत लेखी कळवावे. त्यांनतर आलेल्या पत्रांच्या विषयाचे अथवा शंकांचे निरसन करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही.
३. सभासदांना देण्यात येणाऱ्या लाभांषाची रक्कम बँक सभासदांच्या बँकेतील सेव्हिंग्ज् / चालु किंवा अन्य खात्यात जमा देत असते. ज्या सभासदांचे खाते बँकेत नसेल त्यांनी त्वरित खाते उघडून या सेवेचा लाभ घ्यावा.
४. ९७ व्या घटनादुरूस्तीनंतर सभासदांची वर्गवारी क्रियाशिल सभासद व निष्क्रीय सभासद अशी करण्यांत येत आहे. यापुढे क्रियाशिल सभासदांनाच संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाग घेण्याचा, मतदान करण्याचा अधिकार राहणार आहे. क्रियाशिल सभासदांसाठी पुढील अटी आहेत.
   १. बँकेच्या पोटनियम क्र. १४ व १५ नुसार सभासदाने कमीतकमी ₹ १५००/- चे भाग धारण करणे आवश्यक आहे. तसेच पाच वर्षात एकातरी वार्षिक सभेस उपस्थित रहावयाचे आहे.
   २. सभासदाची बँकेत रूपये सात हजाराची ठेव असावी किंवा त्यांचा रूपये एक लाखाचा कर्जव्यवहार असणे आवश्यक आहे.
   तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी व ज्या सभासदांनी हे निकष पुर्ण केले नसतील, तर त्यांनी ते पुर्ण करावेत.

## शाखा विस्तार

| अ.क्र. | शाखेचे नांव | दुरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|
| ०१ | मुख्यालय (स्वमालकीची वास्तु) | (०२११२)२२४८६५, २२२८४४/९९२२४४४१५० |
| ०२ | बारामती शाखा | (०२११२)२२४८६६, २२७७०४/९९२२४४४१५१ |
| ०३ | इंदापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१११)२२३२७७, २२४७६६/९९२२४४४१५३ |
| ०४ | भिगवण शाखा | (०२११८)२४६२०५ /९९२२४४४१५४ |
| ०५ | दौंड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११७) २६४४७७,२६४९५९ /९९२२४४४१५५ |
| ०६ | चिंचवड शाखा | (०२०) २७४५०११०, ७३५४८२६/९९२२४४४१५६ |
| ०७ | कोथरूड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २५३९५२०० /९९२२४४४१५७ |
| ०८ | मार्केट यार्ड शाखा | (०२०) २४३६०९६६ /९९२२४४४१५८ |
| ०९ | निरा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११५) २४२४७७ /९९२२४४४१५९ |
| १० | फलटण शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१६६) २२२७७७ /९९२२४४४१६१ |
| ११ | करमाळा शाखा | (०२१८२) २२०९७७ /९९२२४४४१६० |
| १२ | बार्शी शाखा | (०२१८४) २२२०८९ /९९२२४४४१६२ |
| १३ | पुणे - नगर रोड शाखा | (०२०) २७०११९४२, २७०११९३७ /९९२२४४४१६३ |
| १४ | लक्ष्मी रोड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २४४५५५१७ /९९२२४४४१६४ |
| १५ | हडपसर शाखा | (०२०) २६९८१८६६ /८३८०००४२९२ |
| १६ | सातारा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१६२) २३७९४०,२३७९५५ /९९२२४४४१६५ |
| १७ | सोलापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१७)२७२९२६६, २७२९२७७/९९२२४४४१६६ |
| १८ | जळोची शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २२४८६५, २२४८४४ /९८५०८९४५४९ |
| १९ | संगमनेर शाखा | (०२४२५) २२७६६६, २२२७०१ /८३८०००४२९४ |
| २० | चाकण शाखा | (०२१३५) २४९११२ /८३८०००४२९५ |
| २१ | शिरूर शाखा | (०२१३८) २२२२६६ /८३८०००४२९७ |
| २२ | अहमदनगर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२४१) २३२७७०१ /८३८०००४२९६ |
| २३ | नवी सांगवी शाखा | (०२०) २७२०३०८८ /९९२२९११४०४ |
| २४ | भोसरी शाखा | (०२०) २७११००१६ /९९२२४४४२०८ |
| २५ | सिंहगड रोड शाखा | (०२०) २४३५५१५५ /७८८७८८०१५३ |
| २६ | काष्टी शाखा | (०२४८७) २३११७७ /७८८७८८०१५४ |
| २७ | शिरवळ शाखा | (०२१६९) २४५२४४ /७८८७८८०१५९ |
| २८ | तळेगांव शाखा | (०२११४) २२२८४४ /७८८७८८०१५६ |
| २९ | हिंजवडी शाखा | (०२०)२२९३४६४६ ७८८७८८०१५७ |
| ३० | टेंभुर्णी | (०२१८३) २३१९७७ /७८८७८८०१५८ |
| ३१ | सिन्नर | (०२५५१) २२२६६६ /७८८७८८०१६० |
| ३२ | श्रीरामपूर | (०२४२२) २२५५६६ /७८८७८८०१६१ |
| ३३ | मोहोळ | (०२१८९) २३३८७७ /७८८७८८०१६२ |
| ३४ | पनवेल | (०२२)२७४५५०४६ - |
| ३५ | माळेगांव | (०२११२)२५४११२ ७८८७८८०१६४ |
| ३६ | कोंढवा | (०२०) २६९३३१३१ ७८८७८८०१६५ |
| ३७ | वाई | (०२१६७) २२२७७७ ७८८७८८०१६३ |
| ३८ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष) | (०२११२) २४४२५४ /९०२८७७७२४३ |

## ❋ संचालक मंडळ ❋

**श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची**
अध्यक्ष

**श्री. अविनाश रमेश लगड**
उपाध्यक्ष

**श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर**
कार्यकारी संचालक

| | | |
|---|---|---|
| श्री. रमणिक रामजी मोता | श्री. सचिन सदाशिव सातव | ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी |
| श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के | श्री. दिग्विजय पोपटराव तुपे | श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर |
| श्री. उध्दव सोपानराव गावडे | श्री. सुरेश गुलाबराव देवकाते | श्री. विजयराव प्रभाकरराव गालिंदे |
| श्री. कपिल राजेंद्र बोरावके | डॉ. वंदना उमेश पोतेकर | सौ. कल्पना प्रदिप शिंदे |

**श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे**
तज्ञ संचालक (सी.ए.)

**ॲड. श्री. सतिश शिवलिंग सालपे**
तज्ञ संचालक

**बँकर्स**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई
दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई
दि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पुणे
स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बारामती
एच.डी.एफ.सी. बँक, पुणे

## दि. ३१ मार्च २०१८ अखेर शाखावार ठेवी, कर्जे व नफा या बाबतची माहिती

(₹ कोटीत)

| अनु. | शाखेचे नांव | ठेवी | कर्ज | नफा / तोटा |
|---|---|---|---|---|
| ०१ | बारामती शाखा | २८४.७३ | १६१.९४ | १.४९ |
| ०२ | इंदापूर शाखा | ११३.५६ | ६८.०२ | ०.७४ |
| ०३ | भिगवण शाखा | ४७.९३ | २०.५० | ०.२४ |
| ०४ | दौंड शाखा | ५१.५२ | ५१.३५ | ०.५४ |
| ०५ | चिंचवड शाखा | ९८.५० | ५९.३० | ०.५६ |
| ०६ | कोथरूड शाखा | ७४.४२ | २०.०० | ०.२७ |
| ०७ | मार्केट यार्ड शाखा (धनकवडी) | ६५.४२ | ४९.३४ | ०.५८ |
| ०८ | निरा शाखा | ६६.५२ | २४.९५ | ०.१९ |
| ०९ | फलटण शाखा | ३३.८७ | ३९.५४ | ०.४६ |
| १० | करमाळा शाखा | ४०.६९ | २१.९८ | ०.१८ |
| ११ | बार्शी शाखा | ४९.३० | ५८.०४ | ०.३७ |
| १२ | पुणे – नगर रोड शाखा | ४८.७७ | ६३.६४ | ०.६० |
| १३ | लक्ष्मी रोड शाखा (सदाशिव पेठ) | ३०.२० | २६.४४ | ०.३८ |
| १४ | हडपसर शाखा | ३५.७४ | ५०.८४ | ०.५७ |
| १५ | सातारा शाखा | ६२.५९ | ५७.६९ | ०.५७ |
| १६ | सोलापूर शाखा | २६.५५ | २३.१४ | ०.२९ |
| १७ | जळोची शाखा | ८९.३७ | ९६.९९ | ०.४१ |
| १८ | संगमनेर शाखा | ७२.५० | ५.५८ | ०.०८ |
| १९ | चाकण शाखा | २५.४८ | १३.१६ | ०.०६ |
| २० | अहमदनगर शाखा | ३१.६२ | ४.२५ | ०.०१ |
| २१ | शिरूर शाखा | ४०.३६ | २४.९९ | ०.०५ |
| २२ | नवी सांगवी शाखा | १९.८१ | ५.९६ | ०.०५ |
| २३ | भोसरी शाखा | २३.५४ | १६.६३ | ०.०८ |
| २४ | सिंहगड रोड शाखा | ८.६४ | ४.३० | ०.०२ |
| २५ | शिरवळ शाखा | १२.२० | ८.१३ | ०.०४ |
| २६ | काष्टी शाखा | १३.९१ | ७.०१ | ०.०९ |
| २७ | तळेगांव शाखा | ६.४१ | ४.६५ | ०.०२ |
| २८ | हिंजवडी शाखा | ८.३७ | १२.४३ | ०.१२ |
| २९ | टेंभुर्णी शाखा | ७.९६ | ९.८१ | ०.०८ |
| ३० | सिन्नर शाखा | २६.५४ | ५.१६ | ०.०३ |
| ३१ | श्रीरामपूर शाखा | ११.२० | ०.८२ | ०.०२ |
| ३२ | मोहोळ शाखा | ३.५५ | १.०६ | –०.०१ |
| ३३ | पनवेल शाखा | ७.१० | २.१३ | –०.०२ |
| ३४ | माळेगांव बु.।। शाखा | ११.६५ | ४.३८ | –०.०१ |
| ३५ | कोंढवा शाखा | ४.९६ | ०.६६ | –०.०१ |
| ३६ | वाई शाखा | ७.७० | ०.९३ | –०.०२ |
| ३७ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष.) | १.७५ | ०.१५ | –०.०१ |
| ३८ | मुख्यालय | ०.०० | ०.०० | १.१४ |
| | **एकूण** | **१५६४.९३** | **१०२५.८९** | **१०.२५** |



# सन २०१७-१८ चा ५७ वा अहवाल

**श्रीकांत सिकची (अध्यक्ष)**

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

आपल्या बँकेच्या ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या प्रसंगी मी आपणा सर्वांचे मा. संचालक मंडळाच्या वतीने मनापासुन स्वागत करतो व आपल्या उपस्थितीबद्दल आभार व्यक्त करतो.

दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक आपणापुढे सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

आपल्या सर्वांचा बँकेवरील अढळ विश्वास, सदिच्छा व सहकार्य तसेच मा. आ. श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाने अहवाल सालात ठेवी, कर्जे, नफा, संगणकीय सेवा इत्यादी सर्व क्षेत्रांत भरीव प्रगती केलेली आपणांस दिसून येईल. बँकेच्या विकासाचा वेग बँकेच्या शाखा, जमा होणाऱ्या ठेवी व कर्ज वाटप यांच्यात योग्य समन्वय यांवर अवलंबून असतो.

अहवाल सालाचे सुरूवातीस बँकेच्या ठेवी ₹ १३३०.२१ कोटी इतक्या होत्या. अहवाल सालात ठेवींमध्ये ₹ २३४.७२ कोटींनी वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१८ अखेर एकुण ठेवी ₹ १५६४.९३ कोटी इतक्या झालेल्या आहेत. ठेवींमधील ही वाढ शे. १८ टक्के इतकी आहे. भारतीय बँकींग व्यवस्थेमध्ये ठेवींमधील वाढ अहवाल सालात कमी झालेली आहे. मात्र आपल्या बँकेतील ठेवींचा वेग वाढता आहे. बँकेतील सेवकांकडून दिली जाणारी उत्कृष्ठ ग्राहकसेवा व अत्याधुनिक बँकींग तंत्रज्ञान, आपल्या सर्व सभासद व ठेवीदारांचे बँकेवरील नितांत प्रेम यांमुळे ठेवींमध्ये वाढ झालेली आहे हे मला नमुद करावे वाटते.

बँकेच्या ठेव वाढीच्या प्रमाणात कर्जवाटप होणे अत्यंत आवश्यक असते. अहवाल सालात कर्जवाटप ₹ ९४१.०६ कोटीवरून ₹ १०२५.८९ कोटी इतके झालेले आहे. ही वाढ शे. ९ टक्के इतकी आहे. कर्जवाटप करतांना भारतीय रिझर्व बँकेचे नियमास आधीन राहून कर्जवाटप केलेले आहे. अल्पउत्पन्न गट, अग्रक्रम व दुर्बल घटकांसाठी बँकेने कर्जवाटपात प्राधान्य दिले आहे. बँकेचे वसुल भागभांडवल अहवाल सालात ₹ २.४५ कोटींनी वाढ होऊन वर्षअखेरीस भागभांडवल ₹ २८.८४ कोटी इतके झालेले आहे. त्याचप्रमाणे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण शे. १३.४७ टक्के इतके झाले आहे. दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर बँकेचा ढोबळ नफा ₹ २१.२८ कोटी इतका झाला आहे. आयकर व इतर कायदेशीर तरतुदी वजा जाता बँकेस निव्वळ नफा ₹ १०.२५ कोटी इतका झाला आहे. मागील वर्षीपेक्षा अहवाल सालात निव्वळ नफा ₹ ०.७२ कोटींनी वाढलेला आहे. दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर बँकेचा नेट एन.पी.ए. १.७२ टक्के इतका आहे. अहवाल सालात बाजारातील आर्थिक मंदी, शेतमालाचे पडलेले भाव यांमुळे बँकेच्या वसुलीवर परिणाम होत आहे. सदरचे प्रमाण कमी करण्याचा संचालक मंडळाचा निर्धार आहे. आपण सर्वांनी त्यास सहकार्य करावे ही विनंती.

दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर सरकारी लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून बँकेस ऑडीट वर्ग 'अ' मिळालेला आहे. तसेच भारतीय रिझर्व बँकेची तपासणी झालेली असून त्यांनी बँकेच्या कामकाजाची प्रशंसा केलेली आहे. अहवाल सालात सभासदांना त्यांच्या भागावर शेकडा १२ टक्के इतका लाभांष देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतलेला आहे. आपण त्यास मान्यता दयावी ही विनंती. अहवाल सालात बँकेच्या एकूण ३६ शाखा कार्यरत असून १ विस्तारित कक्ष आहे. बँकेची २८ एटीएम मशिन्स आहेत. तसेच बँकेच्या सर्व शाखांत आर.टी.जी.एस., नेफ्ट ची सुविधा आहे.

त्याचबरोबर पॅनकार्ड, जीएसटी, विजबिल भरणा, इन्कमटॅक्स इत्यादी सरकारी कर भरण्याची सुविधा सर्व शाखांत आहेत. तसेच पंतप्रधान जीवन सुरक्षा विमा व पंतप्रधान जीवन ज्योती विमा या सरकारी विम्याचे संरक्षण ग्राहकांना उपलब्ध केलेले आहे. तसेच मोबाईल बँकींग व एस.एम.एस. बँकींग सुविधा देखिल उपलब्ध आहेत. बँकींग क्षेत्रात सध्या अमुलाग्र बदल होत आहेत. माहिती व तंत्रज्ञानाचा जास्तीतजास्त वापर बँकींग मध्ये होत आहे. त्यासाठी इतर बँकेच्या बरोबरीने राहण्याचा आपला नेहमीच प्रयत्न असतो. मला सांगण्यास अभिमान वाटतो की सरकारी व खाजगी बँकेच्या बरोबरीने संगणकीय सर्व बदल आपल्या बँकेने केलेले आहेत. बँक लवकरच नेटबँकींग सुरू करणार असून त्यासाठीचा प्रस्ताव रिझर्व बँकेस पाठविलेला आहे. त्याची मंजूरी येताच नेटबँकींग सुविधा आपल्या बँकेच्या ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. या सर्व सेवांमुळे आज पुणे जिल्हयातील पहिल्या पाच सहकारी बँकांमध्ये आपल्या बँकेची गणना होत आहे ही आपल्या सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.

आगामी काळात बँकेच्या ठेवी ₹ १७५० कोटीपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे उद्दिष्ठ नक्कीच साध्य करू यात शंका नाही. तसेच बँकेच्या शिरवळ, भिगवण, बार्शी व टेक्सटाईल पार्क, एम.आय.डी.सी. बारामती या शाखा स्वतःचे मालकीच्या करण्याचा मनोदय आहे. त्यामुळे स्वमालकीच्या शाखांची संख्या १४ इतकी होईल.

अहवाल सालात मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवारसो, मा. आ. श्री. अजितदादा पवारसो माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. खा. सौ. सुप्रियाताई सुळे, मा. सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क यांनी व आपण सर्वांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य यामुळेच बँकेचा विकास व प्रगती झाली आहे. तसेच बँकेचे उपाध्यक्ष, सर्व संचालक मंडळ, मुख्यालयातील अधिकारी, शाखांचे शाखाधिकारी, सर्व सेवकवर्ग व सभासद बंधु भगिनी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले याबद्दल मी सर्वांचे मनःपुर्वक आभार व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या संमतीने आपणास अहवाल सादर करीत असून त्यास आपण मंजुरी प्रदान करावी ही विनंती.

कळावे,

आपला कृपाभिलाषी,
**श्रीकांत सिकची**
(अध्यक्ष)

# ✻ सन २०१७-१८ चा ५७ वा अहवाल ✻

### सभासद

अहवाल वर्षाच्या सुरूवातीस एकुण सभासद संख्या १५१४१ इतकी होती. अहवाल वर्षात नव्याने १७२७ सभासद झाले आहेत व २५३ सभासद कमी झाले आहेत. अहवाल वर्षअखेर सभासदांची संख्या १६६१५ इतकी आहे.

### भागभांडवल

मागील वर्षी बँकेचे वसुल भागभांडवल ₹ २६.३९ कोटी इतके होते. अहवाल सालात भाग भांडवलामध्ये ₹ २.४५ कोटींनी वाढ होऊन वर्ष अखेरीस एकुण भागभांडवल ₹ २८.८४ कोटी इतके झालेले आहे.

### भांडवल पर्याप्तता (CRAR)

(Capital to Risk Weightd Assets Ratio)

दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १३.४७% इतके आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या निकषाप्रमाणे हे प्रमाण ९% इतके आवश्यक आहे. दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर हे प्रमाण ४.४७% इतके जास्त ठेवलेले आहे.

### निधी

बँकेचे स्थैर्य व सुरक्षितता राखीव व इतर निधीवर अवलंबून असते. बँकेचा आर्थिक पाया भक्कम होणेसाठी भागभांडवला बरोबरच राखीव व इतर निधीची पुरेशी तरतुद असणे महत्वाचे आहे. मागील वर्षी बँकेचा राखीव निधी व इतर निधी ₹ ९५.८१ कोटी इतका होता. अहवाल सालात त्यामध्ये ₹ ९.०६ कोटींनी वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१८ अखेरीस राखीव निधी ₹ १०४.८७ कोटी इतका झालेला आहे.

### ठेवी

अहवाल सालाचे सुरूवातीस बँकेच्या एकुण ठेवी ₹ १३३०.२१ कोटी इतक्या होत्या. अहवाल वर्षात ठेवींमध्ये ₹ २३४.७२ कोटींनी वाढ होऊन दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर एकुण ठेवी ₹ १५६४.९३ कोटी इतक्या झालेल्या आहेत. बँकेच्या ठेव वाढीचे प्रमाण शे. १८% इतके आहे.

ठेवींमध्ये बँकेच्या गेल्या ५६ वर्षाच्या काळात पहिल्यांदाच ₹ २०० कोटींपेक्षा जास्त वाढ एका वर्षात झालेली आहे. भारतातील एकुण बँकींग व्यवसायामध्ये सन २०१७-१८ मध्ये ठेव वाढीच्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येत आहे. मात्र आपल्या बँकेच्या ठेवींमध्ये भरघोस वाढ झालेली आहे. यावरून सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांचा बँकेवरील दृढ विश्वास दिसून येतो.

### कर्जे

दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर एकुण कर्जवाटप ₹ ९४१.०६ कोटी होते. अहवाल सालात कर्जवाटपात ₹ ८४.८३ कोटींची वाढ होऊन वर्षअखेर एकुण कर्जवाटप ₹ १०२५.८९ कोटी झालेले आहे. कर्जवाटपात सध्या बँकांमध्ये तिव्र स्पर्धा असुन बाजारातील अस्थिर वातावरणामुळे कर्ज मागणी कमी होत आहे. तरी सुध्दा आपल्या बँकेच्या कर्जवाटपात वाढ झालेली आहे. ही वाढ शे.९% इतके आहे.

भारतीय रिझर्व बँकेचे नियमास अधिन राहून बँकेने कर्जवाटप केलेले आहे. तसेच कर्जाची गुणवत्ता राखण्यातही यश मिळविलेले आहे. कर्जवाटपातील वाढीमुळे नफाक्षमता वाढण्यास मदत झालेली आहे.

### गुंतवणूक व निधी व्यवस्थापन

बँकेची गुंतवणूक एसएलआर व नॉन एसएलआर अशा दोन भागात विभागलेली असते. कर्ज व्यवहाराप्रमाणेच बँकेच्या उत्पन्नात महत्वाचे योगदान गुंतवणूक विभागाचे असते. रिझर्व बँकेचे गुंतवणुक धोरणानुसार गुंतवणुकीचे सर्व व्यवहार केले जातात.

बँकेचे यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडे SGL खाते असून सर्व व्यवहार रिझर्व बँकेतील चालू खात्यातून केले जातात.

त्यासाठी CCIL ची मेंबरशिप बँकेस मिळालेली आहे.

गतवर्षी बँकेची गुंतवणूक ₹ ३६९.९२ कोटी रूपयांची होती. अहवाल सालात त्यामध्ये ₹ १३७.५९ कोटी रूपयांची वाढ होऊन वर्षअखेर एकुण गुंतवणूक ₹ ५०७.५१ कोटी इतकी झाली आहे.

**अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रातील कर्जपुरवठा**

भारतीय रिझर्व बँकेचे निकषानुसार कर्ज वाटपामध्ये अग्रक्रम क्षेत्रास शे. ५३.१४ टक्के इतके कर्जवाटप केलेले आहे. तर त्यापैकी दुर्बल घटकांस शे. २५.१० टक्के कर्जवाटप केलेले आहे.

**एन.पी.ए.**

दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरीस ०.९५% इतका नेट एन.पी.ए. होता. अहवाल सालात नेट एन.पी.ए. मध्ये ०.७७% वाढ होऊन नेट एन.पी.ए. १.७२% इतका झालेला आहे. नोटाबंदी व जीएसटी तसेच व्यवसायातील मंदी यामुळे बरेच व्यापाऱ्यांना अडचणींना तोंड दयावे लागत आहे. तसेच शेतमालाचे भाव पडलेले आहेत. त्यामुळे वसुलीवर परिणाम होत आहे. अहवाल सालात नेट एन.पी.ए. कमी करण्यावर भर देण्यात येईल. त्यासाठी थकबाकीदारांनी वेळीच थकबाकी भरावी अन्यथा जाहीर नोटीस, जप्ती व लिलाव यांसारख्या कटु प्रसंगांना सामोरे जावे लागेल. बँकेस खात्री आहे खातेदार असा प्रसंग येऊ देणार नाहीत व आपली थकबाकी वेळेवर भरतील.

**रिझर्व बँक तपासणी**

दिनांक ३१ मार्च २०१७ अखेरचे इन्स्पेक्शन रिझर्व बँकेचे अधिकारी श्री. राजीव सिन्हा (जनरल मॅनेजर) व श्री. चेतन गोरेकर (मॅनेजर) यांनी पुर्ण केले असून लेखापरिक्षण कालावधीत बँकेने केलेली प्रगती व सूचनांचे पालन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले व बँकेच्या वाढीच्या संदर्भात मौलीक सुचना केल्या आहेत व बँकेत उत्कृष्ठ आर्थिक व्यवस्थापन असल्याचे नमुद केले आहे. (FSWM) हा दर्जा मिळाला आहे. संचालक मंडळ त्यांचे अत्यंत आभारी आहे.

**वैधानिक लेखापरिक्षण**

दिनांक ३१ मार्च २०१८ चे वैधानिक लेखापरिक्षण ब्रमास अ‍ॅण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांनी पुर्ण केलेले असून ऑडीट वर्ग 'अ' कायम ठेवला आहे.

**आय.टी.विभाग**

**ए.टी.एम.**

अहवाल सालात बँकेच्या ए.टी.एम. कार्ड धारकांची संख्या ३७८४८ इतकी असून ए.टी.एम. कार्ड भारतातील सर्व बँकांच्या ए.टी.एम. शी संलग्न केलेली आहेत. त्यामुळे आल्या बँकेच्या खातेदारांना भारतातील कोणत्याही बँकेच्या ए.टी.एम. मधून रक्कम काढता येते. तसेच अन्य बँकेच्या खातेदारांना आपल्या बँकेच्या ए.टी.एम. मधून रक्कम काढता येते.

सध्या आपल्या बँकेच्या २८ शाखांत ए.टी.एम. मशिन आहेत. दौंड, बारामती, सातारा याठीकाणी ए.टी.एम. सहीत कॅश डिपॉझीट मशिन बसविलेली आहेत.

**एस.एम.एस. बँकींग**

खातेदारांच्या खात्यात झालेल्या व्यवहाराची माहिती त्वरित मिळणेसाठी एस.एम.एस. सेवा उपलब्ध आहे. ज्या खातेदारांना ही सेवा पाहीजे असेल त्यांनी आपला मोबाईल नंबर त्यांचे खात्याशी नोंदणी करून घ्यावा. सध्या ही सुविधा ४८३३२ इतके खातेदार घेत आहेत.

**आर.टी.जी.एस.**

भारतीय रिझर्व बँकेकडून सर्व शाखांना IFSC कोड मिळालेला आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या मार्फत ही सेवा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे ग्राहकांना त्वरित रक्कम मिळण्याची अथवा पाठविण्याची सोय उपलब्ध झालेली आहे.

## CCIL

सरकारी रोखे व्यवहारासाठी आपल्या बँकेस क्लिअरींग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची मेंबरशिप मिळालेली आहे. त्यामुळे NDS OM या साईटवर आपल्याला रोखे खरेदी विक्रीची व्यवस्था मिळालेली आहे. त्यामुळे कोणत्याही ब्रोकर शिवाय हे व्यवहार

करता येणे शक्य झालेले आहे. भविष्यात गुंतवणूक विभागास चांगला उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध झालेला आहे.

**नॉन बँकींग उत्पन्न**

१) बँकेच्या दैनंदीन व्यवहारातून जसे उत्पन्न मिळते त्याव्यतिरिक्त उत्पन्न मिळविण्यासाठी आपल्या बँकेने Exide Life Insurance ची कॉर्पोरेट एजन्सी घेतलेली आहे. त्यामधुन अहवाल सालात ₹ ३७.३० लाख इतके उत्पन्न मिळालेले आहे.

२) बँकेने जनरल इन्शुरन्ससाठी ICICI Lombard ची कॉर्पोरेट एजन्सी घेतलेली असून अहवाल सालात याव्दारे ₹ ३४.३० लाख इतके उत्पन्न मिळालेले आहे.

याशिवाय विज बिल भरणा, जीएसटी भरणा, पॅन कार्ड काढून देण्याची व गॅस सबसिडी खात्यामध्ये जमा करण्याची सुविधा दिलेली आहे. तसेच पंतप्रधान जिवन विमा योजना व पंतप्रधान अपघात विम्याचे हप्ते भरण्याची सुविधा मिळत आहे. खातेदारांनी या सर्व सेवा सुविधांचा लाभ घ्यावा व बँकेशी आपले नाते दृढ करावे ही विनंती.

**सेवकवर्ग**

संस्थेची प्रगती व यश हे सेवकवर्गाची निष्ठा व कार्यक्षमता यांवर अवलंबून असते. अहवाल सालात सर्वच सेवकांनी ठेव वाढ व कर्ज वाटप, वसुली यासर्व क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे.

सध्याच्या बँकींग स्पर्धेच्या युगात अन्य बँकांबरोबर राहण्यासाठी सेवकांना भारतीय रिझर्व बँक, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असो, पुणे तसेच विठ्ठलराव विखे पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र याठीकाणी प्रशिक्षणास पाठवून त्यांना बँकींगचे अदयावत ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. अहवाल सालात २२५ सेवकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**नफा वाटणी**

दि. ३१ मार्च २०१८ अखेर बँकेस ₹ १०२४८७३९३.२३ इतका नफा झालेला आहे. मागील वर्षीचा शिल्लक नफा ₹ २६९३.१९ जमेस धरता एकुण नफा ₹ १०२४९००८६.४२ नफा वाटणीस उपलब्ध आहे. सदर नफ्याची वाटणी खालील प्रमाणे करावी अशी मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण त्यास मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|
| १ | गंगाजळी (रिझर्व फंड) | ३,७०,००,०००.०० |
| २ | लाभांष (द.सा.द.शे.१२%) | ३,२५,००,०००.०० |
| ३ | इमारत निधी | २,२५,००,०००.०० |
| ४ | शाखाविस्तार निधी | १०,००,०००.०० |
| ५ | गुंतवणुक अवमुल्यन निधी | ७४,००,०००.०० |
| ६ | लाभांष समिकरण निधी | ७,००,०००.०० |
| ७ | धर्मादाय निधी | २,००,०००.०० |
| ८ | आकस्मित निधी | २,००,०००.०० |
| ९ | सभासद शिक्षण निधी | ७,००,०००.०० |
| १० | निवडणूक निधी | २,००,०००.०० |
| ११ | शिल्लक नफा | ९०,०८६.४२ |
| | **एकूण** | **१०,२४,९०,०८६.४२** |

### लाभांष

सभासदांना त्यांचे भागावर शे. १२% लाभांष वितरीत करण्याची मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण ती मान्य करावी ही विनंती.

### मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जे

मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक निकषानुसार कर्ज वाटप केलेले नाही.

### शाखाविस्तार

दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर मुख्यालयासहीत ३६ शाखा, १ विस्तारित कक्ष कार्यरत आहे. नविन शाखांमुळे ठेवी, कर्जवाटप व सभासद संख्येत मोठी वाढ होत आहे. त्यामुळे भागभांडवलातही मोठी वाढ होत आहे. पुढील काळात भिगवण, शिरवळ, बार्शी, टेक्सटाईल पार्क या जागा स्वमालकीच्या करावयाच्या आहेत. त्यासाठी पुरेसा निधी बँकेकडे उपलब्ध आहे. त्यामुळे स्वालकीच्या शाखांची संख्या १४ होणार आहे.

### पुरस्कार

बँकेच्या कामगिरीचा बँक असोसिएशन कडून दरवर्षी आढावा घेतला जातो. सन २०१७ सालासाठी एन.पी.ए. व्यवस्थापनासाठी पुणे जिल्हा नागरी सह बँक्स असोसिएशनचा पुरस्कार मिळालेला आहे. तसेच पुणे जिल्हा मध्य. सह. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी समारंभानिमित्त पुणे जिल्हयातून दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार आपल्या बँकेस मिळालेला आहे.

### आभार

बँकेच्या दैनंदिन विकास व प्रगतीसाठी वेळोवेळी ज्या व्यक्तिंचे, संस्थांचे सहकार्य मिळाले त्यांचे ऋणनिर्देशन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामध्ये आपले आदरणीय लोकनेते पद्मविभूषण मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, मा. आ. श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य), मा. खासदार सौ. सुप्रियाताई सुळे, मा.ना.श्री. रामराजे नाईक निंबाळकर सभापती, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य, मा. श्री. विश्वासराव देवकाते, अध्यक्ष, जिल्हा परिषद, पुणे, मा. सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, बारामती, मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. खा. श्री. विजयसिंह मोहिते पाटील, मा. श्री. राजेंद्र पवार, अध्यक्ष, बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, मा. श्री. रणजित पवार, अध्यक्ष, बारामती सहकारी औद्योगिक वसाहत, यांचे बँकेच्या प्रगतीसाठी सदैव मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी व ऋणी आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. रमेशआप्पा थोरात व उपाध्यक्षा सौ.अर्चना घारे, इंदापुरचे आमदार मा. श्री. दत्तात्रय भरणे, मा. श्री. दशरथ माने माजी सभापती कृषी व पशु संवर्धन जिल्हा परिषद पुणे, मा. श्री. पुरूषोत्तम (दादा) जगताप अध्यक्ष सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, मा. श्री. अमरसिंह घोलप अध्यक्ष श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, मा.श्री. रंजनकुमार तावरे अध्यक्ष, दि माळेगांव सहकारी साखर कारखाना, मा. श्री. बाळासाहेब तावरे माजी अध्यक्ष दि माळेगांव सहकारी साखर कारखाना तसेच बारामती नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. पौर्णिमा तावरे तसेच माजी अध्यक्ष सर्वश्री श्री सदाशिव (बापू) सातव, श्री जवाहरशेठ वाघोलीकर, श्री इम्तियाज शिकीलकर, मा. सौ. जयश्रीताई सातव तसेच अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. अरहतदास शहा इत्यादींनी बँकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

तसेच सर्व शाखा क्षेत्रातील नगर परिषदांचे अध्यक्ष, पुणे, पिंपरी चिंचवड व सोलापूर महानगरपालिकांचे महापौर, उपमहापौर व बारामती तालुका दूध उत्पादक संघ, बारामती तालुका खरेदी विक्री संघ, बारामती तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषद पुणे, श्री. काशिविश्वेश्वर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्या., बिल्डर्स असोसिएशन बारामती, बारामती स्विमर्स क्लब, व्यापारी महासंघ बारामती, बारामती मर्चंटस् असोसिएशन, तसेच बँकेच्या शाखांच्या कार्यक्षेत्रातील विविध सहकारी संस्था, पतसंस्था सर्व संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांनी बँकेच्या विकासामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या बँकेस सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

आगामी वर्षात आपणा सर्वांचे असेच सहकार्य व मार्गदर्शन बँकेस मिळेल व प्रगतीचा पुढचा टप्पा गाठण्यास आपणा सर्वांची सक्रीय मदत होईल यात शंका नाही. भारतीय रिझर्व बँकेचे रिजनल ऑफि स मुंबई येथील सर्व अधिकारी, मा. डॉ. श्री. विजय झाडे सहकार आयुक्त व निबंधक सह. संस्था पुणे, मा. श्री. मधुकर चौधरी आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, मा. डॉ. श्री. आनंद जोगदंड अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, मा. श्री. दिपक तावरे, विभागीय सहनिबंधक सह. संस्था, मा. डॉ. श्री. सोपान शिंदे, उपनिबंधक सहकारी संस्था (नागरी बँका), मा. श्री. आनंद कटके जिल्हा उपनिबंधक सह. संस्था (पुणे ग्रामीण), मा. श्री. बी. टी. लावंड जिल्हा उपनिबंधक सह. संस्था (पुणे शहर), मा. डॉ. श्री. किशोर तोष्णीवाल अप्पर निबंधक सह. संस्था (प्रशासन), मा. श्री. राजेश जाधवर अप्पर निबंधक (लेखापरिक्षण), मा. श्री. किरण गायकवाड उपनिबंधक सह. संस्था (परसेवा) पुणे, जिल्हा नागरी सहकारी बँक असो., मा. श्री. एस. एस. कुंभार साहेब सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, बारामती तालुका, मा. श्री. डी.सी.गाडे साहेब विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था, बारामती यांनी व त्यांच्या खात्यातील सर्व अधिकारी, तसेच सन २०१७-१८ सालचे शासकीय लेखापरिक्षक रूचिता बोबाना ब्रमास ॲण्ड असो., चार्टर्ड अकौंटंट, पुणे, अंतर्गत लेखापरिक्षक मे. गुंड गावडे आणि कंपनी, मे. अभिजीत दिवेकर ॲण्ड असो. चार्टर्ड अकौंटंटस, पुणे, विक्रांत साळुंके ॲण्ड असो. चार्टर्ड अकौंटंटस, पुणे, टॅक्स कन्स्लटंट मे. एम.डी. बलदोटा आणि कं. चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे तसेच मा. डॉ. श्री. शौचे व्ही.जी. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.श्री. जेरे पी.बी. प्रशिक्षण प्रमुख पुणे जिल्हा बँक असो. यांनी बँकेस वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.

त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स् फेडरेशन लि. मुंबई, दि पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असो., पुणे, बँकेचे सर्व सभासद, हितचिंतक व ग्राहक यांनी वेळोवेळी सहकार्य करून बँकेच्या विकासास हातभार लावल्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. वर्तमानपत्रे, साप्ताहिके यांचे सर्व संपादक व वार्ताहर मित्रांनी बँकेच्या कामकाजाला वेळोवेळी दिलेल्या प्रसिध्दी बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

अनेक ज्ञात अज्ञात थोर व्यक्ति व संस्थांनी वेळोवेळी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष केलेल्या सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

जयहिंद ! जय महाराष्ट्र !

आपला

**श्रीकांत सिकची**

अध्यक्ष,

**दि बारामती सहकारी बँक लि**

# लेखापरीक्षकाचा अहवाल

(बँकींग रेग्युलेशन ॲक्ट सन १९४९ कलम ३१ नुसार आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ८१ (५–ब) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ खालिल नियम ६९ अन्वये)

दि बारामती सहकारी बँक लि., बारामती या बँकेचा दिनांक ३१ मार्च २०१८ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व हिशोबाबाबत या बँकेचे सरकारी लेखापरीक्षक म्हणून आम्ही अहवाल सादर करीत आहोत.

बँकेच्या शाखाधिकारी यांनी सादर व प्रमाणित केलेल्या व मुख्य कार्यालयाने हिशोबात अंतर्भूत केलेल्या हिशोबी पत्रकासह, दि बारामती सहकारी बँकेचा दिनांक ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद व त्या तारखेस संपणाऱ्या नफा–तोटा पत्रकाचे आम्ही लेखापरीक्षण केले आहे.

लेखापरीक्षण वृत्तांतातील आमचे शेरे व सूचनांसह पात्र राहून आम्ही निवेदन देतो की,

१. बँकेच्या हिशोबी पुस्तकावरून तसेच आम्हास दिलेल्या माहितीवरून व केलेल्या खुलाशावरून बँकेने तयार केलेला ताळेबंद पूर्ण व वस्तुनिष्ठ असून त्यात आवश्यक त्या सर्व बाबी समाविष्ठ आहेत. तो बँकेच्या आर्थिक बाबींचे खरे व वास्तव स्वरूप दर्शवितो.

२. (याकामी) आम्ही ज्यावेळी काही स्पष्टीकरण किंवा माहिती विचारली ते स्पष्टीकरण अगर माहिती बँकेने आम्हांस दिली व अशी माहिती समाधानकारक दिसून आली.

३. आमच्या लेखापरीक्षणात दिसून आलेले बँकेचे व्यवहार, बँकेच्या अखत्यारीतील आहेत.

४. बँकेच्या शाखांकडून मिळालेली नैमित्तिक पत्रके लेखापरिक्षणाचे कामी पुरेशी असल्याचे दिसून आले.

५. वरील हिशोबी वर्षाअखेरचे नफा–तोटा पत्रक हे खरे व वस्तुनिष्ठ असून नफ्याचे वास्तव चित्र दर्शविते.

६. आमच्या मते, सदरचा ताळेबंद व नफा–तोटा पत्रक हे कायद्यातील तरतुदीस पात्र राहून केलेले आहे आणि

७. आमच्या मते, बँकेने कायद्यास अनुसरून हिशेबी पुस्तके ठेवलेली आहेत.

**८. सन २०१७–१८ या वर्षासाठी बँकेस लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यांत आला आहे.**

**स्वाक्षरी /–**
**रूचिता बोबाना पार्टनर ब्रमास ॲण्ड असोसिएटस्**
**चार्टर्ड अकौंटंटस, पुणे**

**दिनांक : १३/८/२०१८**
**स्थळ : पुणे**

## दिनांक ३१ मार्च २०१८

| दि. ३१ मार्च २०१७ ₹ पैसे | भांडवल व देणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१८ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| | भाग भांडवल | | |
| **४०००००००००.००** | **अधिकृत भागभांडवल** | | **४०००००००००.००** |
| | | | |
| **२६३८९८३००.००** | **वसुल भागभांडवल** | | **२८८३७२९४०.००** |
| | भाग प्रत्येकी ₹ २०/- चे | | |
| **९५८०७४१२३.६२** | **गंगाजळी व इतर निधी** | | **१०४८७२३१००.२२** |
| १८७५३३९३२.६६ | गंगाजळी निधी | २२२२९२१५२.६६ | |
| १९०१४४७८०.८० | इमारत निधी | २१२६४४७८०.८० | |
| ३५०११२०.७८ | शाखा विस्तार निधी | ४५०११२०.७८ | |
| ५५७३२.०० | कर्मचारी कल्याण निधी | ५५७३२.०० | |
| २७१९८.०० | सुवर्ण महोत्सव निधी | २७१९८.०० | |
| १०००००.०० | बँक पुरस्कार निधी | १०००००.०० | |
| ९५५८२१.०० | धर्मदाय निधी | ११५५८२१.०० | |
| ६५६८३५.६९ | आकस्मित खर्च निधी | ८५६८३५.६९ | |
| ४५४२३७०.०० | सभासद कल्याण निधी | ५८३७६२०.०० | |
| ११०५०००.०० | सभासद प्रशिक्षण निधी | १७७५०००.०० | |
| ४२४०६०२.९५ | लाभांष समिकरण निधी | ४७४०६०२.९५ | |
| २५२९०१०००.०० | एन.पी.ए. निधी | २६७९०१०००.०० | |
| १३३००००००.०० | एन.पी.ए. निधी (गृहकर्ज व शेती कर्ज) | १५३००००००.०० | |
| १४९८६७४७.०० | थकव्याज निधी | १४९८६७४७.०० | |
| ९००९९५८.४१ | गुंतवणूक घसारा निधी | १६७५०८०७.४१ | |
| २१४३०६९०८.०० | संपत्ती पुर्नमुल्यांकन निधी | २०३५९१५६२.६० | |
| २४७०६११९.३३ | गुंतवणूक चढ उतार निधी | ३२२०६११९.३३ | |
| ३६००००००.०० | सक्षम मालमत्तेसाठी तरतूद | ४४००००००.०० | |
| **१३३०२०५७५८०.६५** | **ठेवी** | | **१५६४९२९१३७९.४६** |
| १०१५१५६९७५५.८२ | मुदत ठेव खाते | १२६०६३२६५४८.८२ | |
| १०४२३८३१७.०० | आवर्तक ठेव खाते | १३४१९०७८०.०० | |
| १२०८८९७९६.०० | अल्प बचत ठेव खाते | १२००९५०९९.०० | |
| २२८५५४०६६८.०० | सेव्हींग्ज् ठेव खाते | २०४५४११४६४.८७ | |
| ६३९८१९०४३.८३ | चालू ठेव खाते | ७४३२६७४८६.७७ | |
| **१४५२४०३०००७.२७** | **बेरीज पुढील पानावर** | | **१६९८६३८७४१९.६८** |

## अखेरचा ताळेबंद

(रक्कम रुपयात)

| दि. ३१ मार्च २०१७ ₹ पैसे | जिंदगी व येणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१८ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **२९३३९३९४६.६७** | **हातातील रोख शिल्लक** | | **३३०६९००५०.६८** |
| **६०७८८०२०१.२२** | **इतर बँकांतील शिल्लक** | | **८३४५४९७०३.५४** |
| **३६९९१५८५५८.३१** | **गुंतवणूक** | | **५०७५०९७२६२.३१** |
| **९४१०६३४९९३.९१** | **कर्जे** | | **१०२५८८८०१५१.८५** |
| | **१ अल्पमुदतीची कर्जे** | | |
| ४५३१११७३१७.७९ | अ) सुरक्षित कर्जे | ५०६७०८५१३७.२५ | |
| | पैकी थकबाकी ₹ १५२२४६३०२.५३ | | |
| ४३८९१७६८४७.७५ | **२ मध्यम मुदतीची कर्जे** | ४६४१४०५७८४.२३ | |
| | अ) सुरक्षित ₹ ४५०४९७९०६५.२३ | | |
| | पैकी थकबाकी ₹ २१५९६२३७१.६४ | | |
| | ब) असुरक्षित ₹ १३६४२६७१९.०० | | |
| | पैकी थकबाकी ₹ ९३१४३०९.२३ | | |
| | **३ दिर्घ मुदतीची कर्जे** | | |
| ४९०३४०८२८.३७ | अ) सुरक्षित | ५५०३८९२३०.३७ | |
| | पैकी थकबाकी ₹ १७६८८३८९.४४ | | |
| **१४०११०६७७००.११** | **बेरीज पुढील पानावर** | | **१६४९९२१७१६८.३८** |

## दिनांक ३१ मार्च २०१८

| दि. ३१ मार्च २०१७ ₹ पैसे | भांडवल व देणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१८ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| **१४५२४०३०००७.२७** | **बेरीज मागील पानावरून** | | **१६९८६३८७४१९.६८** |
| | | | |
| **५३०८११.००** | वसुलीसाठी आलेली बिले | | **३४०३४०२.००** |
| **४८४३८१२.४१** | शाखा जुळवणी | | **0.00** |
| **६२०९२५७७.०९** | थकव्याज येणे | | **६१६३४८१३.०९** |
| | | | |
| **५८१८३४७१.६६** | **इतर देणी** | | **१०४६५४१६८.९८** |
| १३१२९४०९.०० | व्याज देणे | १६२७९०६६.०० | |
| २३५६५३२५.६० | पेस्लीप / डी.डी. पेअबल | ३३४८०८७५.६० | |
| १०५२३१५.०० | डिव्हीडंड देणे | ११०७२६४.०० | |
| २०४३६४२२.०६ | इतर देणी | ५३७८६९६३.३८ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **९५३०२६९३.१९** | **नफा** | | **१०२४९००८६.४२** |
| ३०११४.४९ | मागील वर्षाचा शिल्लक | २६९३.१९ | |
| ९५२७२५७८.७० | चालू वर्षाचा | १०२४८७३९३.२३ | |
| **१४७४४९८३३७२.६२** | **बेरीज** | | **१७२५८५६९८९०.१७** |
| | **संभाव्य देणी (Contingent Liabilities ) (as per contra)** | | |
| **१२५६०००.००** | **बँक गॅरंटी** | | **२६५००००.००** |
| **३११५१२१.००** | **डिपॉझीट एज्युकेशन अवेरनेस फंड (DEAF)** | | **३११५१२१.००** |

तपासले आमचे याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.

**रुचिता बोबाना**
ब्रमास ॲण्ड असोसिटस
चार्टर्ड अकौंटंटस् (पुणे)

श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष

दिग्विजय पोपटराव तुपे
संचालक

सुभाष रामचंद्र जांभळकर
संचालक

डॉ. वंदना उमेश पोतेकर
संचालिका

सौ. कल्पना प्रदिप शिंदे
संचालिका

## अखेरचा ताळेबंद

(रक्कम रुपयात)

| दि. ३१ मार्च २०१७ ₹ पैसे | जिंदगी व येणी | रक्कम (₹) ₹ पैसे | दि. ३१ मार्च २०१८ ₹ पैसे |
|---|---|---|---|
| १४०११०६७७००.११ | **बेरीज मागील पानावरून** | | १६४९९२१७१६८.३८ |
| ६७००१७८६.१५ | **व्याज येणे (सरकारी रोखे गुंतवणुक)** | | ९३८४८९६२.३२ |
| ६२०९२५७७.०९ | **थकव्याज येणे** | | ६१६३४८१३.०९ |
| | | | |
| 0.00 | **शाखा जुळवणी** | | ६३७४३.१९ |
| ५३०८११.00 | **वसुलीसाठी पाठविलेली बिले** | | ३४०३४०२.00 |
| | | | |
| ६०४२९०४९८.२७ | **इतर मालमत्ता** | | ६००४०१८०१.१९ |
| ३९३३३२१४१.३५ | जागा व इमारत | ३८५१३६८६५.९५ | |
| १९४६१०३६०.०९ | डेड स्टॉक व फर्निचर | २०४२२४४०६.०८ | |
| २५६३०१०.०० | डिपॉझिटस् | २६३९१४८.१६ | |
| २७९०१५१.५८ | शिल्लक छपाई | २०७००२८.०० | |
| १०९९४८३५.२५ | इतर येणी | ६३३१३५३.०० | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| १४७४४९८३३७२.६२ | **बेरीज** | | १७२५८५६९८९०.१७ |
| | **संभाव्य देणी (Contingent Assets) (as per contra)** | | |
| | | | |
| ३११५१२१.00 | **डिपॉझीट एज्युकेशन अवेरनेस फंड (DEAF)** | | ३११५१२१.00 |

रमणिक रामजी मोता
संचालक

सचिन सदाशिव सातव
संचालक

ॲड. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी
संचालक

देवेंद्र रामचंद्र शिर्के
संचालक

उध्दव सोपानराव गावडे
संचालक

सुरेश गुलाबराव देवकाते
संचालक

विजयराव प्रभाकरराव गालिंदे
संचालक

कपिल राजेंद्र बोरावके
संचालक

प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)

ॲड. सतिश शिवलिंग सालपे
तज्ञ संचालक

श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक

## दिनांक ३१ मार्च २०१८

| दि. ३१ मार्च २०१७ ₹ पैसे | खर्च | दि. ३१ मार्च २०१८ ₹ पैसे |
|---|---|---|
| १६३३१६१०८०.९१ | ठेवीवरील व्याज | १७२९१७६३३३.४२ |
| ५३२५६०३.०० | कर्जावरील व्याज | २३६६२९.०० |
| १३१२११५९३.३३ | कर्मचारी वर्ग वेतन व भत्ते | १५९१८६४५३.२९ |
| १०३२४८४७.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | १२११५६३८९.०० |
| १५००००००.०० | ग्रुप ग्रॅच्युइटी खर्च | २००००००.०० |
| ५००३७५.७६ | संचालक मंडळ प्रवास खर्च | ८५०९५०.१३ |
| ३५०००००.०० | सरकारी व स्थानिक लेखापरीक्षण शुल्क | ४२५००००.०० |
| १७५४८९४५.०० | जागा भाडे व नगरपरिषद कर | १९५१७१७५.०० |
| १६३५९४५६.७६ | विमा खर्च | १८५४६३६८.५० |
| ५२९८०५५.९५ | विज खर्च | ५६४४२१४.०० |
| ३१४६९.०० | लिगल फी | ६००००.०० |
| १६५७३२३.५१ | पोस्टेज व टेलीफोन | १७७७७६३.७९ |
| २७९७८२२.४० | छपाई व लेखन साहित्य | ३३७६६५७.५२ |
| ९२१६२४.०० | वृत्तपत्र जाहिरात खर्च | १०८६४१६.०० |
| १६७९९८६३.७६ | घसारा | १९३६१०४७.९९ |
| ८००४८१.३१ | कर्मचारी वर्ग प्रवास खर्च | ९१२२५४.३० |
| ११९५९६७१.६२ | सर्वसाधारण खर्च | १०२०१००१.१९ |
| ८१६५९९.९० | समाशोधन शुल्क | १०२४११४.११ |
| २६१०२६.०० | वर्गणी व देणगी | २६४७७६.०० |
| ४०५५९५.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ४४९६०३.०० |
| ६०५०००.०० | आयकर | ५००००००००.०० |
| ११२४८७९४.९४ | इतर खर्च | १९५०८१९०.९८ |
| | **तरतूदी :** | |
| ३००००००००.०० | एन.पी.ए. व निर्लेखन निधी | ३५३२००२१.८९ |
| १५००००००.०० | एन.पी.ए. तरतूद (गृहकर्ज व शेती कर्ज ) | २००००००.०० |
| १००००००००.०० | सक्षम मालमत्ता तरतूद | ८००००००.०० |
| ४१५९९७६.०० | रोखे गुंतवणूक घसारा निधी तरतूद | ७७४०८४९.०० |
| ५८४००२४.०० | रोखे प्रिमियम ॲमॉरटायजेशन | ७२५९१५१.०० |
| ९५२७२५७८.७० | नफा | १०२४८७३९३.२३ |
| २०७९७०२८०७.८५ | **एकूण बेरीज** | २२२२३९३७५२.३४ |

तपासले आमचे याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.

**रुचिता बोबाना**
ब्रमास ॲण्ड असोसिटस
चार्टर्ड अकौंटंटस् (पुणे)

श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष

अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष

दिग्विजय पोपटराव तुपे
संचालक

सुभाष रामचंद्र जांभळकर
संचालक

डॉ. वंदना उमेश पोतेकर
संचालिका

सौ. कल्पना प्रदिप शिंदे
संचालिका

## चे नफातोटा पत्रक

(रक्कम रुपयात)

| दि. ३१ मार्च २०१७ ₹ पैसे | उत्पन्न | दि. ३१ मार्च २०१८ ₹ पैसे |
|---:|---|---:|
| **१६९७३४२७७४.९०** | **कर्जावरील व्याज** | **१८२३४३७६७८.७०** |
| **३५०९७३४३५.०१** | गुंतवणूकीवरील व्याज | **३६५३५३८७३.५०** |
| **४१४२०१.००** | शेअर्स वरील लाभांष | **४३४२००.००** |
| **८०२९४४०.१२** | कमिशन व वटाव | **८४३९९६७.४६** |
| | **इतर उत्पन्न :** | |
| **२२९४२९५६.८२** | फॉर्म फी, लॉकर भाडे व किरकोळ उत्पन्न | **२४७२८०३२.६८** |
| **२०७९७०२८०७.८५** | **एकूण बेरीज** | **२२२२३९३७५२.३४** |

| | | | |
|---|---|---|---|
| रमणिक रामजी मोता<br>संचालक | सचिन सदाशिव सातव<br>संचालक | ॲड. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी<br>संचालक | देवेंद्र रामचंद्र शिर्के<br>संचालक |
| उध्दव सोपानराव गावडे<br>संचालक | सुरेश गुलाबराव देवकाते<br>संचालक | विजयराव प्रभाकरराव गालिंदे<br>संचालक | कपिल राजेंद्र बोरावके<br>संचालक |
| प्रितम सुर्यकांत पहाडे<br>तज्ञ संचालक (सी.ए.) | ॲड. सतिश शिवलिंग सालपे<br>तज्ञ संचालक | श्रीनिवास गोपाळराव बहुळकर<br>कार्यकारी संचालक | |

## सन २०१७-१८ वर्षात झालेल्या प्रत्यक्ष उत्पन्न व खर्चाची माहिती

### खर्च

(रक्कम ₹ कोटीमध्ये)

| अनु. | खर्चाचा तपशिल | अंदाज केलेला खर्च | प्रत्यक्ष झालेला खर्च | कमी अगर जास्त |
|---|---|---|---|---|
| १ | ठेवीवरील व्याज | १७७.०० | १७२.९२ | -४.०८ |
| २ | कर्जावरील व्याज | ०.७५ | ०.०३ | -०.७२ |
| ३ | सेवक वर्ग वेतन व भत्ते | १४.२५ | १५.९२ | +१.६७ |
| ४ | सेवक वर्ग भविष्य निर्वाह निधी व ग्रुप ग्रॅच्युइटी अंशदान | १.७५ | १.४२ | -०.३३ |
| ५ | सं.मं. प्रवास खर्च व सभा भत्ता | ०.१५ | ०.०९ | -०.०६ |
| ६ | सेवक वर्ग प्रवास खर्च | ०.१० | ०.०७ | -०.०३ |
| ७ | जागा भाडे व स्थानिक कर | २.२५ | १.९५ | -०.३० |
| ८ | टपाल, तार व दूरध्वनी व वीज खर्च | ०.८० | ०.७४ | -०.०६ |
| ९ | छपाई व लेखन साहीत्य | ०.५० | ०.३४ | -०.१६ |
| १० | हिशेब तपासणी फी | ०.५० | ०.४३ | -०.०७ |
| ११ | अनुत्पादक मालमत्ता (एन.पी.ए.) साठी तरतूद | ४.०० | ४.५३ | +०.५३ |
| १२ | समाशोधन/विमा, वर्गणी व देणगी | २.०० | १.९७ | -०.०३ |
| १३ | वृत्तपत्र जाहीरात | ०.१५ | ०.११ | -०.०४ |
| १४ | घसारा | १.८५ | १.९४ | +०.०९ |
| १५ | सर्व साधारण/वार्षिक सभा व इतर खर्च | २.५० | ३.०३ | +०.५३ |
| १६ | गुंतवणूक रोखे घसारा निधी तरतूद व आयकर | ८.४५ | ६.५० | -१.९५ |
| १७ | नफा | १०.०० | १०.२५ | +०.२५ |
| | **एकूण** | **२२७.००** | **२२२.२४** | **-४.७६** |

### उत्पन्न

| **अनु.** | **उत्पन्नाचा तपशिल** | **अंदाज केलेले उत्पन्न** | **प्रत्यक्षात झालेले उत्पन्न** | **कमी अगर जास्त** |
|---|---|---|---|---|
| १ | कर्जावरील व्याज | १८७.०० | १८२.३४ | -४.६६ |
| २ | गुंतवणुकीवरील व्याज | ३६.५० | ३६.५४ | +०.०४ |
| ३ | कमीशन व वटाव | १.०० | ०.८४ | -०.१६ |
| ४ | इतर उत्पन्न | २.५० | २.५२ | +०.०२ |
| | **एकूण** | **२२७.००** | **२२२.२४** | **-४.७६** |

## अहवालासोबत सादर करावयाची सांख्यिकिय माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अनु. | तपशिल | ३१/०३/२०१७ | ३१/०३/२०१८ |
|---|---|---|---|
| १ | भांडवल पर्याप्तता प्रमाण | | |
| | अ) भांडवल निधी प्रकार – १ | ११.०२ | ११.१७ |
| | ब) भांडवल निधी प्रकार – २ | २.३८ | २.३० |
| | एकूण | १३.४० | १३.४७ |
| २ | भांडवली पर्याप्ततेची वाटचाल | | |
| | अ) भांडवल निधी प्रकार – १ | ७२८४.२३ | ८१७०.११ |
| | ब) भांडवल निधी प्रकार – २ | १५७१.४४ | १६७८.२२ |
| | एकूण | ८८५५.६७ | ९८४८.३३ |
| | क) जोखिम संपत्तीच्या भाराचे गणन | ६६०८७.११ | ७३०८६.९३ |
| ३ | गुंतवणूक (एस.एल.आर.) | | |
| | १) पुस्तकी मूल्य | २७९१३.१६ | ३६३२७.५५ |
| | २) मूळ किंमत | २७३६९.६० | ३५९०३.४० |
| | ३) बाजार मूल्य | २८००१.६८ | ३५०६४.८९ |
| | गुंतवणूक (नॉन एस.एल.आर.) | | |
| | १) एम.एस.सी.बँक मुदत ठेवी | ५.०० | ५.०० |
| | २) डी.सी.सी. बँक मुदत ठेवी | ८५३५.०० | ११२७१.०० |
| | ३) बँका मुदत ठेवी व इतर | ४९५.०० | ३१०४.०० |
| | ४) शेअर्स (जिल्हा बँक, एम.एस.सी. बँक मुंबई) | ४३.४२ | ४३.४२ |
| ४ | कर्ज | | |
| | अ) स्थावर मालमत्ता | – | – |
| | ब) बांधकाम | ११५७३.५५ | १२७३५.६७ |
| | क) गृहतारण | ३४६४.१६ | २७९६.३६ |
| | एकूण | १५०३७.७१ | १५५३२.०३ |
| ५ | शेअर्स आणि डिबेंचर्सवर कर्जे | नाही | नाही |
| ६ | संचालक व त्यांचे नातेवाईक, कंपनी, संस्था व | | |
| | १) संचालक व त्यांचे नातेवाईक | – | – |
| | २) थकबाकी | – | – |
| ७ | ठेवींचा सरासरी परिव्यय | ८.९६% | ८.००% |

## अहवालासोबत सादर करावयाची सांख्यकिय माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अनु. | तपशिल | | ३१/०३/२०१७ | ३१/०३/२०१८ |
|---|---|---|---|---|
| ८ | अनुत्पादित मालमत्ता (एन.पी.ए.) | | | |
| | अ) सकळ थकबाकी | टक्केवारी | ३.९१% | ४.५८% |
| | | रक्कम | ३६८२.६३ | ४६९८.८७ |
| | ब) निव्वळ थकबाकी | टक्केवारी | ०.९५% | १.७२% |
| | | रक्कम | ८७०.७५ | १७१६.९९ |
| ९ | लाभदायकता/नफा क्षमता | | | |
| | अ) खेळत्या भांडवलाशी व्याजापासून मिळालेल्या | | १३.९५% | १२.७३% |
| | उत्पन्नाची टक्केवारी | | | |
| | ब) खेळत्या भांडवलाशी इतर उत्पन्नाची टक्केवारी | | ०.२१% | ०.२०% |
| | क) खेळत्या भांडवलाशी ढोबळ नफ्याची टक्केवारी | | १.४१% | १.२४% |
| | ड) जिंदगीवरील परतावा | | १६.१०% | १५.३६% |
| | इ) निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी टक्केवारी | | ०.६५% | ०.६०% |
| | फ) प्रति कर्मचारी व्यवसाय | | ८७०.२२ | ९२५.२९ |
| १० | चालू वर्षात थकीत कर्जासाठी केलेली तरतूद | | ४१५.०० | ४५०.०० |
| ११ | गुंतवणुकीवरील घसाऱ्यासाठी केलेली तरतूद | | ४२.०० | ७७.४१ |
| १२ | अनुत्पादक मालमत्तेतील बदल | | | |
| | आरंभीची शिल्लक | | ३०८७.६९ | ३६८२.६३ |
| | (−) वसुली | | ४७८.३६ | ६८९.३९ |
| | (+) नविन थकबाकी | | १०७३.३० | १७०५.६३ |
| | सकळ थकबाकी | | ३६८२.६३ | ४६९८.८७ |
| | (−) तरतूद | | २८११.८८ | २९८१.८८ |
| | निव्वळ थकबाकी | | ८७०.७५ | १७१६.९९ |
| १३ | तरतूदी | | | |
| | सक्षम मालमत्ता | | ३६०.०० | ४४०.०० |
| | गुंतवणुक चढ उतार निधी | | २४७.०६ | ३२२.०६ |
| १४ | विदेशी चलन संपत्ती व देयता | | नाही | नाही |
| १५ | मुदत ठेवीसाठी भरलेल्या विम्याची रक्कम | | ७६.८१ | ८५.१८ |

# सन २०१८-१९ सालाचे अंदाजपत्रक

## खर्च

(रक्कम ₹ कोटीमध्ये)

| अनु. | खर्चाचा तपशिल | अनुमानित खर्च |
|---|---|---|
| १ | ठेवीवरील व्याज | १८८.०० |
| २ | कर्जावरील व्याज | ०.५० |
| ३ | सेवक वर्ग वेतन व भत्ते | १५.५० |
| ४ | सेवक वर्ग भविष्य निर्वाह निधी व ग्रुप ग्रॅच्युइटी अंशदान | १.७५ |
| ५ | सं.मं. प्रवास खर्च व सभा भत्ता | ०.१५ |
| ६ | सेवक वर्ग प्रवास खर्च | ०.१० |
| ७ | जागा भाडे व स्थानिक कर | २.२५ |
| ८ | टपाल, तार व दूरध्वनी व वीज खर्च | ०.८० |
| ९ | छपाई व लेखन साहीत्य | ०.५० |
| १० | हिशेब तपासणी फी | ०.५० |
| ११ | अनुत्पादक मालमत्ता व निर्लेखन निधी तरतूद | ४.५० |
| १२ | समाशोधन/विमा, वर्गणी व देणगी | २.१० |
| १३ | वृत्तपत्र जाहीरात | ०.२० |
| १४ | घसारा | २.१० |
| १५ | सर्व साधारण खर्च व इतर खर्च | २.२५ |
| १६ | गुंतवणूक, रोखे घसारा निधी व आयकर | ७.७० |
| १७ | नफा | १०.६० |
| | **एकूण** | **२३९.५०** |

## उत्पन्न

| अनु. | उत्पन्नाचा तपशिल | अनुमानित उत्पन्न |
|---|---|---|
| १ | कर्जावरील व्याज | १९८.५० |
| २ | गुंतवणुकीवरील व्याज | ३७.०० |
| ३ | कमीशन व वटाव | १.०० |
| ४ | इतर उत्पन्न | ३.०० |
| | **एकूण** | **२३९.५०** |

# परिशिष्ट अ

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव | **दि बारामती सहकारी बँक लि.** | |
| मुख्य कार्यालयाचा पत्ता | भिगवण रोड, बारामती, जि. पुणे पिन - ४१३ १०२ | |
| नोंदणीचा दिनांक व क्रमांक | दि. २३/०९/१९६१ (रजि.नं. ३१२४६) | |
| रिझर्व बँकेच्या परवान्याचा क्रमांक व दिनांक | डी.बी.ओ.डी./यु.बी.डी./एम.एच.४९८ पी - दिनांक १८ ऑगस्ट १९८६ | |
| | | |
| दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर | | रक्कम ₹ कोटीमध्ये |
| कार्यक्षेत्र | पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, रायगड व अहमदनगर जिल्हे | |
| शाखांची संख्या (मुख्य कार्यालयासह) | ३७ + विस्तारित कक्ष ०१ | |
| सभासद | नियमित | १६६१५ |
| | नाममात्र | २९९१ |
| वसुल भागभांडवल | | २८.८४ |
| राखीव व इतर निधी | | १०४.८७ |
| ठेवी | बचत ठेवी | २०४.५४ |
| | चालु ठेवी | ७४.३३ |
| | मुदत व इतर ठेवी | १२८६.०६ |
| दिलेली कर्जे | सुरक्षित | १०१२.२५ |
| | असुरक्षित (विनातारणी) | १३.६४ |
| एकूण कर्जापैकी अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रास | अग्रक्रम क्षेत्रासाठी | ५३.१४% |
| झालेल्या कर्जवाटपाची टक्केवारी | त्यापैकी दुर्बल घटकासाठी | २५.१०% |
| गुंतवणुक | महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. व इतर बँकेतील ठेवी | ११८.८० |
| | म.रा.सह. बँक लि./ पुणे जि.म.सह. बँक लि. शेअर्स | ०.४३ |
| | सरकारी रोखे व इतर | ३८८.२८ |
| नेट एन. पी. ए. | | १.७२% |
| शासकीय लेखापरिक्षण वर्ग सन २०१७-१८ | | 'अ' |
| एकूण कायम सेवक वर्ग | | २८० |
| नफा | | १०.२५ |
| खेळते भागभांडवल | | १७१९.३५ |

## * सभासद व खातेदारांना विनंती *

- कर्ज फेडीची मुदत लक्षात ठेवा व वेळेवर कर्जहप्ते भरून बँकेस सहकार्य करा.

- बँकेने दिलेले पासबुक प्रत्येक व्यवहारानंतर ते भरले आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. त्यातील नोंदी बँकेच्या सेवकाच्या स्वाक्षरीने प्रमाणित करून घ्याव्यात.

- सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास तो कृपया ताबडतोब बँकेस कळवावा.

- कॅश-क्रेडिट खातेदारांनी दरमहा दिनांक ७ तारखेपर्यंत बँकेस स्टॉक स्टेटमेंट आणून द्यावेत व शेकडा दोन टक्के जादा व्याज आकारणी टाळावी.

- कर्जास तारण असलेल्या स्थावर मिळकतीवर बँक कर्जाची नोंद करून घ्यावी.

- कॅश क्रेडीट व इतर कर्जासाठी तारण दिलेल्या मालाचा किंवा स्थावर/जंगम मालमत्तेच्या विमा पॉलीसीचे नुतनिकरण वेळेवर करून घ्यावे विमा. पॉलीसीमधिल मालमत्तेच्या पत्त्याबाबत खातेदारांनी जागृत रहावे. कारण मालमत्तेस काही कारणाने हानी पोहचल्यास विम्याच्या दाव्याची रक्कम मिळण्यास अडचणी येऊ शकतात याची कर्जदारांनी नोंद घ्यावी.

- ₹ २०,०००/- पेक्षा जास्त रक्कमेची ठेव रोखीने परत घेता येणार नाही.

- बँकेचे सर्व सभासद व खातेदार यांचेसाठी एस.एम.एस. (SMS) बँकींगची सुविधा सुरू आहे. तरी सभासदांनी आपले भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक खात्यावर नोंदवून घ्यावेत.

- सर्व खातेदारांना नम्र विनंती करण्यांत येते की त्यांनी आपल्या खात्यास पॅन कार्ड व आधार कार्डची जोडणी करून घ्यावी. रिझर्व बँकेचे नियम व आयकर खात्याचे निर्देश यानुसार ही जोडणी बंधनकारक आहे.

- बँकेच्या सर्व एटीएम कार्ड धारकांस विनंती करण्यांत येते की त्यांनी एटीएम कार्डचा पासवर्ड, पिन, सिव्हीव्ही कोड इ. ची माहीती कोणीही फोनवर मागितल्यास देऊ नये. बँक अशी माहीती कधीही मागवित नाही.

## ❊ बँकेची वैशिष्ठये ❊

- बँकेचे कार्यक्षेत्र पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक, रायगड व अहमदनगर जिल्हे
- बँकेतील सर्व प्रकारच्या ठेवी (रू. १.०० लाखापर्यंतच्या) ठेव विमा योजने अंतर्गत संरक्षित.
- कोअर बँकींग, मोबाईल बँकींग, एस.एम.एस. बँकींग, ई–टॅक्स पेमेंट, आर.टी.जी.एस., नेफ्ट, ए.टी.एम., लॉकर्स इ.सुविधा उपलब्ध
- सर्व खातेदार व सभासदांसाठी नविन पॅन कार्ड काढण्याची, तसेच जनरल इन्शुरन्स व आर्युविमा इ. सुविधा उपलब्ध
- सर्व शाखा अत्याधुनिक बँकींग सुविधा व सुबक फर्निचर सह सुसज्जीत
- सुवर्ण आभुषणांचे तारणावर त्वरीत कर्ज उपलब्ध
- सभासदांना रू. २.०० लाखापर्यंत अपघाती विम्याचे संरक्षण
- व्यापार, व्यवसाय व नोकरदार सभासदांसाठी विविध कर्ज योजना
- सी.टी.एस. २०१० चेक बुक सुविधा
- संपुर्ण भारतातील ए.टी.एम. सेंटर्स व्दारे व्यवहार करण्याची सुविधा
- विज बिल भरणा सुविधा.
- RTGS, ATM व Mobile Banking इ. साठी स्वतःचा डेटा सेंटर.

# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

## ✻ श्रीरामपूर शाखा उद्घाटन समारंभ ✻

शुक्रवार दि.२८ एप्रिल २०१७ रोजी सकाळी ९.४५ वा. मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. श्री. भाऊसाहेब कांबळे, विधानसभा सदस्य, श्रीरामपूर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





## ✻ सिन्नर शाखा उद्घाटन समारंभ ✻

शुक्रवार दि. २८ एप्रिल २०१७ रोजी दुपारी ३.३० वा. मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. आ. श्री. राजाभाऊ वाजे, आमदार सिन्नर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

---

## ✻ माळेगांव बु. शाखा उद्‌घाटन समारंभ ✻

शनिवार दि. ०३ जून २०१७ रोजी सायं. ५.३० वा. मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. श्री. विश्वासराव देवकाते, अध्यक्ष, जिल्हा परिषद, पुणे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





## ✻ कोंढवा (पुणे) शाखा उद्‌घाटन समारंभ ✻

रविवार दि. १५ ऑक्टोबर २०१७ रोजी सायं ६.३० वा. मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. सौ. वंदनाताई चव्हाण खासदार (राज्यसभा) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

---

## वाई शाखा उद्‌घाटन समारंभ


शुक्रवार दि. १२ जानेवारी २०१८ रोजी सायं ४.३० वा. मा. आ. श्री. अजितदादा पवार मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व मा. आ. श्री. मकरंदआबा पाटील, आमदार, वाई विधानसभा यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.






## खर्च तपशिल

- ठेवी व कर्जावरील व्याज .......७७.८४%
- तरतुदी ......................... २.७०%
- नफा ............................ ४.६१%
- प्रशासकीय खर्च ................ ४.८०%
- व्यवस्थापकीय खर्च ............ ७.८०%
- आयकर ........................ २.२५%




## उत्पन्न तपशिल

- कर्जावरील मिळालेले व्याज ... ८२.०५%
- गुंतवणूकीवरील व्याज .......... १६.४४%
- इतर उत्पन्न ...................... १.११%
- कमिशन व वटाव ............... ०.४०%



# विनम्र श्रध्दांजली

अहवाल सालामध्ये भारतातील
जे ज्ञात, अज्ञात थोर नेते,
संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ,
लेखक, साहित्यिक, कलावंत, जवान,
शिक्षणतज्ञ, देशभक्त, कवी,
सामाजिक कार्यकर्ते,
तसेच सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झाले...
त्यांना नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रध्दांजली.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.



## बँकेच्या खातेदारांसाठी खालील सेवा व सुविधा शाखेमध्ये उपलब्ध



कोअर बँकींग सुविधा

विमा पॉलिसीची सेवा



ATM सुविधा




ऑनलाईन टॅक्स् सुविधा




एस.एम.एस. व मोबाईल बँकींग सुविधा



आर.टी.जी.एस. व नेफ्ट सुविधा



ए.टी.एम. कम डेबीट कार्ड सुविधा

पारितोषिकांनी गौरविलेली आपली बँक



सोने तारण



विज बिल भरणा केंद्र




पॅन कार्ड सेवा



एनी ब्रँच बँकींग / संपूर्ण भारतातील २,५०,००० पेक्षा जास्त ए.टी.एम. सेंटर्स व्दारे व्यवहार

**दि बारामती सहकारी बँक लि.**

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२